वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## अनेक दिवसापासून डॉ.योगेश क्षीरसागरांचा भाजप प्रवेशाचा खेळ आज अखेर औरंगाबाद येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते पूर्ण झालाच

### चटकण राजीनामा आणि पटकण भाजपात हे काही लगेच घडले नाही, याची वाट अनेक दिवसांपासून पाहत होते

# अखेर युवराजांनी हाती घेतले भाजपाचेच कमळ

काय करावे याच चिंतेत ते सकाळपासून बेहाल झाले

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com









संपूर्ण प्रवास हा क्षीरसागर घराण्याचा

## तिकडे त्रास होता, आता मोकळा श्वास घेतल्याची भावना

भाजपमधल्या जबाबदारीविषयी विचारले असता ते म्हणाले, बीडमध्ये प्रत्येक निवडणुकीचीच जबाबदारी आमच्यावर आहे. सध्या बीड विधानसभा क्षेत्राची जबाबदारी राहील. तिकडे काहीतरी त्रास होता. मात्र इकडे आलोय तर मोकळा श्वास घेतल्याची भावना आहे. आगामी काळात बीड तालुक्यात भारतीय जनता पक्षाची विचारधारा दृढ करण्यासाठी, संघटन बळकट करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी पूर्ण प्रामाणिकपणे कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त करतो. बीड तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भारतीय जनता पक्षाचा झेंडा अधिक उंच फडकावा, यासाठी मी अखंड प्रयत्नशील राहणार आहे. बदलासाठीचा हा प्रवास अधिक मजबूत करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि नागरिकांचे सहकार्य माझ्यासाठी महत्त्वाचे आहे.







## नगरसेवक अन् नगराध्यक्ष पदाची उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी तोंबा गर्दी

बीड : उद्या सोमवार रोजी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आज रविवार असतांनाही निवडणूक विभागाकडून उमेदवारी अर्ज स्विकारण्यात येत होते. आज अनेक तगडे आणि नामवंत उमेदवारांनी विविध पक्षांकडून तसेच अपक्ष असे उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले. प्रथम ऑनलाईन अर्ज करायचा आणि त्याची एक प्रत ऑफलाईन पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करावी लागते. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यामध्ये शेख निजाम, अमृत काका सारडा, शेख बिलाल, सफवान खान, रंजित बनसोडेंची पत्नी आरती बनसोडे, सय्यद सादेक अली, सतिश पवार, इम्रान जहाँगिरदार, शेख मेहराज, शेख अमर, मोहंमद खालेद उर्फ सादेक सह इतर दाखल झाले होते.



# भैय्या भैय्या म्हणून मागे पुढे फिरणारे अनेक मुस्लिम नेते, कार्यकर्त्यांचे चक्क बाराच वाजले

निवडणूकीचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आता काही तासच शिल्लक

## भाजपाकडून उमेदवारी भरली तर मुस्लिम मतदार मतदान करणार नाहीत आणि इतर पक्षातुन उमेदवारी घ्यायची तर ते पक्ष उमेदवारी देणार नाही

बीड, (दिव्य न्युज):- अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे बीडचे नेते योगेश क्षीरसागर यांनी मनगटावरील 'घड्याळ' काढून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी कमळ हाती घेतले. नगरपालिका निवडणुकीत भाजपच्या उमेदवारीवर आमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार उभा करून बीड नगर परिषदेत सत्ता मिळवू, असा निर्धार त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केला.

स्थानिक पातळीवर पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत जाणीवपूर्वक डावलले जात असल्याचे कारण सांगून योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादीच्या सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला होता. दुसऱ्याच दिवशी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र ▶▶ पान २ वर

## प्रभाग ९ मधून शेख मेहराज यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग ९ कडे वाढती उत्सुकता

बीड, (दिव्य न्यूज):- बीड शहरातील नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग ९ मध्ये आज मोठी राजकीय घडामोड घडली. सामाजिक कार्यात सदैव आघाडीवर असलेले शेख मेहराज यांनी आज नगरपालिका सदस्यपदासाठी आपला अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यासाठी त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या समर्थकांच्या उत्स्फूर्त गर्दीने प्रभागात निवडणूक रंगतदार होण्याचे संकेत दिले आहेत.

स्थानिक प्रश्न, पाणीटंचाई, रस्त्यांची अवस्था आणि मूलभूत सुविधा या प्रमुख मुद्द्यांसह विकासाला नवी दिशा देण्याचे आश्वासन शेख मेहराज यांनी यावेळी व्यक्त केले. प्रभागातील नागरिकांमध्ये त्यांचा सातत्यपूर्ण संपर्क, विनम्र स्वभाव आणि समस्यांवर त्वरित प्रतिसाद देण्याची पद्धत यामुळे त्यांची प्रतिमा एक ग्राउंड–लेवल लीडर म्हणून निर्माण झाली आहे.प्रभाग ९ मध्ये नवी समीकरणे अर्ज दाखल झाल्यानंतर



प्रभाग ९ मध्ये राजकीय चर्चांना वेग आला आहे. विविध पक्षांतील नेत्यांचे समीकरण, मतदारांचे आकडे आणि स्थानिक गट–तट यामुळे हा प्रभाग महत्त्वाचा ठरणार आहे. शेख मेहराज यांच्या उमेदवारीमुळे स्पर्धा अधिकच रंगणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

## पाली व येळंबघाट गणातील तांदळ्याचीवाडीत कॉर्नर बैठक संपन्न

### बप्पासाहेब घुगे यांनी गावकऱ्यांशी साधला संवाद

बीड , (दिव्य न्यूज):- पाली जिल्हा परिषद सर्कल आणि येळंब घाट पंचायत समिती गणातील तांदळ्याचीवाडी येथे आयोजित करण्यात आलेली कॉर्नर बैठक मोठ्या उत्साहात व उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत स्थानिक प्रश्न, विकासकामे, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजा तसेच मूलभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली.

बैठकीदरम्यान बप्पासाहेब घुगे यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या



अडचणी, अपेक्षा आणि प्रलंबित मागण्या जाणून घेतल्या. गावकऱ्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, शेतीसंबंधी समस्यांबाबत मोकळेपणाने मते मांडली. घुगे यांनी या सर्व प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देत स्थानिक विकासाला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले.तांदळ्याच्यावाडीतील नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहून विकासाची इच्छाशक्ती अधिक दृढ झाल्याचे बप्पासाहेब घुगे यांनी सांगितले. लोकांच्या विश्वासाला उतरून त्यांच्यासाठी काम करणे हीच माझी प्राथमिकता आहे, असेही ते म्हणाले.

कॉर्नर बैठकीमुळे गावकऱ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून आले असून येळंब घाट परिसरातील विकासासाठी या संवादातून सकारात्मक दिशा मिळाल्याची भावना लोकांतून व्यक्त होत आहे.

# प्रा.सुरेश नवले यांचा लवकरच राष्ट्रवादीत प्रवेश

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर उपमुख्यमंत्री अजित पवारांना देणार साथ



बीड, (दिव्य न्यूज):- माजी मंत्री प्रा. सुरेश नवले हे लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार असून, त्यासाठी काल मुंबईत वरिष्ठ पातळीवर बैठका पार पडल्या.

बीडचे माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांच्या भूमिकेला सर्वच निवडणुकीत महत्व असल्याचे, अनेक निवडणुकीत स्पष्ट झालेले आहे. शिवसेना, कॉंग्रेस, शिंदे सेना नंतर शरद पवारांची राष्ट्रवादी अशा अनेक पक्षात विविध पदावर काम केलेले व प्रदीर्घ अनुभव असलेले प्रा. सुरेश नवले हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संर्पकात असून, प्रा. नवले यांचा राष्ट्रवादीत लवकरच प्रवेश व्हावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन मंत्री व नवले यांचे मित्र असलेले मुंबईतील उद्योगपती प्रयत्नशील आहेत. यासाठी मुंबईत अनेक गुप्त बैठका पार पडल्या आहेत. प्रा. सुरेश नवले यांचा लवकरच राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

क्षीरसागर जाणार, नवले येणार

माजी मंत्री जयदत क्षीरसागर यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील प्रवेश अडचणीत असतानाच, डॉ. योगेश क्षीरसागर यांनीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे, त्यातच क्षीरसागर घराण्यांचे कट्टर विरोधक असलेले प्रा. सुरेश नवले हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साथ देणार असल्याने, बीडच्या राजकारणात पुन्हा एकदा प्रा. सुरेश नवले यांच्या भूमिकेला महत्व प्राप्त होणार आहे



बीड : समीर तांबोळी यांनी आज राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटात प्रवेश केला. यावेळी आ विजयसिंह पंडित, जिल्हा अध्यक्ष राजेश्वर चव्हाण, युवक जिल्हा अध्यक्ष बळीराम गवते, गटनेते फारूक पटेल, अल्पसंख्याक जिल्हाअध्यक्ष निजाम, बरकत लाला, वक्ते समीर सय्यद, पक्षाचे, मेहराज शेख, गोपाळ धांडे, समीर तांबोळी सह आदींची उपस्थिती होती.

# डागवडी-पांगरा परिसरात गांजाची लागवड; अमळनेर पोलिसांची कारवाई, आरोपी ताब्यात



अमळनेर,(दिव्य न्युज):- मौजे डागवडी-पांगरा परिसरातील मशोबरीतील शेतात परवानगीशिवाय गांजाची लागवड केल्याप्रकरणी अमळनेर पोलिसांनी छापा टाकून ३ लाख ६२ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जालंदर आबूबा मसल (वय ४८, रा. डागवडी-पांगरा) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून गुन्हा अमळनेर पोलिस ठाण्यात नोंदवला आहे. तपास सपोनि भगवंत सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

घटना १४ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. अमळनेर पोलिस ठाण्यात कार्यरत पोउपनि कृष्णा कांतीलाल चव्हाण यांना सकाळी गुप्त माहिती मिळाली की जालंदर मसल याने डागवडी-पांगरा येथील सर्व्हे नं. २७/१ मधील तुर शेतात बेकायदेशीर गांजाची लागवड केली आहे. माहितीची खातरजमा करून उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसील कार्यालयातील अधिकारी, दोन पंच, फॉरेन्सिक टीम आणि पोलिस पथकासह ठिकाणी छापा टाकण्यात आला.शेताची पाहणी केली असता ४ ते ५ फूट उंचीची तब्बल २० गांजाची झाडे आढळली. बांधावर लाल साडीत गुंडाळून ठेवलेला सुका गांजा देखील सापडला. झाडे उपटून एकत्र करण्यात आली. फॉरेन्सिक तज्ञांनी सॅम्पल घेतल्यानंतर उर्वरित मालाची वजनकाट्याने मोजणी करण्यात आली. चार प्लास्टिक गोण्यांमध्ये मिळालेला ओला आणि सुका गांजा एकूण १२.०७५ किलो निघून त्याची एकूण किंमत ३,६२,२५० रुपये ठरली. मुद्देमाल पंचासमक्ष सीलबंद करण्यात आला.जालंदर मसल याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गांजाची लागवड केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी एनडीपीएस कायदा कलम ८(ब), २०, २०(ब)(ळ), २०(ब)(ळळ) अन्वये अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.सदर कारवाईत फॉरेन्सिक अधिकारी, महसूल अधिकारी, पंच, पोलीस कर्मचारी यांचा सहभाग होता. तपास अमळनेर पोलिसांनी सुरू केला असून अंमली पदार्थांविरोधातील ही महत्त्वपूर्ण कारवाई ठरत आहे.

# थर्मल पॉवर स्टेशन पुरवठा करारात ३१ लाखांची फसवणूक

परळी, (दिव्य न्युज):- थर्मल पॉवर स्टेशन परळी वैजनाथ येथे पुरवठा कराराच्या नावाखाली दोन जणांनी एकूण ३१ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी संभाजीनगर परळी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना २०१७ ते १० ऑगस्ट २०२२ या कालावधीत घडली.

सचिन ईश्वर कागदे, वय ४५, रा. शिवाजीनगर, टीपीएस रोड, परळी यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी २०१७ नंतर पावेतो थर्मल पॉवर स्टेशनच्या बॉयलर साईडसाठी लागणाऱ्या गर्थ गिअर आणि पिनीयन पुरवठ्यासाठी संजय खन्ना, कृष्णा गिअर्स प्रा.लि., गाझीयाबाद यांना १३,००,००० रुपये डिपॉझिट स्वरूपात दिले होते. मात्र त्यांच्या डिलरशिपला रद्द न करता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता साहित्याचा पुरवठा इतर एजन्सीमार्फत करण्यात आला. घेतलेली रक्कम परत मागितल्यावर खन्ना यांनी आज-उद्या करीत पैसे न दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

तसेच बीईएमएल डोझरचे काम मिळवून देण्याच्या कारणावरून खन्ना यांनी ओळख करून दिलेल्या संजय हरदवाणी, रा. काटोल, नागपूर यांनी फिर्यादीकडून घेतलेली १८,००,००० रुपये रोख रक्कमही परत न दिल्याची तक्रार आहे. दोघांनी मिळून एकूण ३१ लाखांची फसवणूक केल्याचे फिर्यादीचे म्हणणे आहे. गुन्ह्याचा तपास पोउपनि शिंदे करत आहेत.



बीड : प्रभाग क्रं. १८ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटाचे उमेदवार आश्पाक इनामदार व सय्यद नदीम यांनी आज पासून डोअर टु डोअर प्रचाराला सुरूवात केली. पहिल्याच दिवशी मतदारांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. प्रत्येक ठिकाणी दोन्ही उमेदवारांचा मतदारांकडून हार, शाल, पुष्पगुच्छ देवून स्वागत करत बहुमतांनी निवडून देण्याचे आश्वासन दिले.



बीड : बीड नगर पालिकेच्या प्रभाग क्रं. ११ मधून सादेक भाई यांनी आज आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आपल्या समर्थकांसोबत दाखल केला. यावेळी सादेक भाई यांचे अनेक समर्थक मोठ्या संख्येने नगर पालिकेत आले होते. सादेक भाई यांना प्रभागात मोठा प्रतिसाद मिळत असून त्यांचा विजय हा निश्चित असल्याचे वातावरण प्रभाग क्रं. ११ मध्ये दिसून येत आहे.

पान १ वरून

## अखेर युवराजांच्या

फडणवीस यांच्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात भाजपमध्ये प्रवेश केला.नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर योगेश क्षीरसागर यांनी राजीनामा दिल्याने राष्ट्रवादीच्या विजयाचे गणित बिघडणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर, आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नेत्या पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपमध्ये प्रवेश केला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने तयारीत होतो. भाजपाच्या कमळ या चिन्हावर आम्ही निवडणूक लढवणार आहोत.

नगराध्यक्ष पदावर योगेश क्षीरसागर म्हणाले...

बीडमध्ये नगराध्यक्ष पदाला अनुसूचित जातीचे आरक्षण आहे. त्यामुळे त्या प्रवर्गातील उमेदवार आम्ही कमळ या चिन्हावर देणार आहोत. भाजपाच्या सर्व पदाधिकारी आणि नेते यांना सोबत घेऊन त्यांची आणि आमची संघटनात्मक शक्ती एकत्र येऊन आम्ही निवडणूक लढवू, असे योगेश क्षीरसागर म्हणाले.

देवेंद्र फडणवीसांचा अजितदादांना मोठा झटका; बीडच्या राजकारणात फेरबदल, बड्या नेत्याचा भाजपमध्ये प्रवेश

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुरु असतानाच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला मोठा धक्का बसला आहे. रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित बीडची विधानसभा निवडणूक लढवलेले डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी मंत्री पंकजा मुंडे उपस्थितीत होत्या. डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या प्रवेशाने बीडमध्ये आता भाजपला बळ मिळणार आहे.

रविवारी सकाळी योगेश क्षीरसागर यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा राजीनामा दिल्यानंतर छत्रपती संभाजी नगरच्या दिशेने रवाना झाले होते. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष योगेश क्षीरसागर यांनी शनिवारी राजीनामा दिला यानंतर रविवारी सकाळी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन पक्षात स्थानिक पातळीवर कुठल्याच निर्णय प्रक्रियेत आपल्याला घेतलं जात नसल्याची नाराजी व्यक्त केली होती.

यानंतर ते छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने रवाना झाले होते. रविवारी त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी मंत्री पंकजा मुंडे उपस्थितीत होत्या. डॉ. क्षीरसागर यांच्या प्रवेशाने येत्या काळात होत असलेल्या निवडणुकीत चित्र बदलणार आहे. त्यांच्या प्रवेशाने बीडमध्ये आता भाजपला मोठी ताकद मिळणार आहे.

वर्षभरापूर्वी झालेली बीडची विधानसभा निवडणूक डॉ. योगेश क्षीरसागर यांनी अजित पवार यांच्या पक्षाकडून लढवताना लक्षवेधी मते मिळवली होती. मात्र, गेल्या काही दिवसापासून त्यांना निर्णय प्रक्रियेतून डावलले जात होते. त्यामुळे त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वात योगेश क्षीरसागर यांनी भाजप प्रवेश केला आहे. त्यामुळे भाजपला बीडमध्ये चांगला चेहरा आणि बळ मिळण्याची शक्यता मानली जात आहे. पक्षाचे काही व डॉ. क्षीरसागरांचे अशी गोळाबेरीज करुन पक्ष सर्व जागा लढणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे येत्या काळात बीड नागरपालिका निवडणुकीत रंगत येणार आहे.

# कार-दुचाकीच्या अपघातात बापलेक गंभीर जखमी

नांदुरघाट, (दिव्य न्युज):- केज-नांदूरघाट रोडवर असलेल्या महावितरणच्या ३३ केव्ही केंद्राच्या समोर दुचाकी आणि अल्टो कारची समोरासमोर धडक होऊन अपघात झाल्याची घटना (दि.१५) नोव्हेंबर रोजी दुपारी ४ च्या सुमारास घडली आहे. यामध्ये दुचाकीवरील बाप-लेक गंभीर असून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

केज-नांदुरघाट रोडवर अल्टो गाडीतून (एमएच २४ पी. ४००१) रणजित हनुमंत गवळी हे शिरूरघाट वरून नांदुरघाटकडे जात होते. तर केजकडे दुचाकीवरून (एमएच २८ बी.पी.१५९४) संतोष राजा काळे (वय ३०) आणि विशाल संतोष काळे हे बापलेक केजकडे निघाले होते. परंतु कारची आणि दुचाकीची नांदुरघाट येथे महावितरणच्या ३३ केव्ही केंद्राच्या समोर मोठी धडक झाली. या अपघातमध्ये दुचाकीवरील दोघे गंभीररीत्या जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी नांदुरघाट ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्यांची स्थिती चिंताजनक असल्याने त्यांना तात्काळ अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर अल्टो कारमधील रणजित हनुमंत गवळी यांच्यावर नांदुरघाट येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

पान १ वरून

## परळी नगरपालिका

शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट,माकप अशा पक्षांच्या स्थानिक पदाधिकार्यांची दि.२६ ऑक्टोबर रोजी बैठक घेतली.यानंतर आम्ही पुढाकार घेत आमच्यापेक्षा अधिक सक्षम उमेदवार असेल तर त्यावर विचार करु असेही ठरले.परंतु राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थानिक नेत्यांची वेगळी चुल मांडण्याची तयारी सुरु झाली आणि त्यांनी आपल्या पक्षातील पदाधिकार्यास अध्यक्षपदासाठी पुढे करण्याऐवजी ज्या व्यक्तीने २०११ साली नगराध्यक्षपद भुषवुन परळीचे वातावरण गढुळ करणार्या व्यक्तीच्या खांद्याला खांदा लावुन काम केले.काही महिन्यापर्यंत त्या नेत्याचा उदोउदो करत आले आणि अचानकपणे शहरात अपक्ष उमेदवारी जाहिर करुन प्रचाराच्या कामाला लागलेल्या व्यक्तीचे कपडे बदलुन महाविकास आघाडीत आणल्यानंतर त्यास आम्ही कडाडून विरोध केला.परळी शहरातील जनता भ्रष्टाचार, गुंडागर्दी याला कंटाळलेली असुन शहराच्या विकासासाठी आम्ही कॉंग्रेसच्या वतीने महाविकास आघाडीकडुन उमेदवार देत पुर्ण ताकदीने निवडणूक लढवणार असल्याचे सय्यद हनिफ यांनी सांगितले.

## प्रभाग १४ च्या

राहिली आहे. लोकांना सातत्याने सेवा देणे आणि त्यांच्या समस्या त्वरित सोडवणे हेच आमचे ध्येय आहे. आम्ही कामात प्रामाणिकपणा व तत्परता कायम ठेवली आहे, असे पत्रकाद्वारे आरती बनसोडे यांनी म्हटले आहे. या उमेदवारीनंतर प्रभागातील नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले असून, आपल्या अपेक्षा पूर्ण करणारा उमेदवार म्हणून आरती बनसोडे यांना समर्थन मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.